INDIAN STREAMS RESEARCH JOURNAL
ISSN NO : 2230-7850
IMPACT FACTOR : 5.1651 (UIF)
VOLUME - 13 | ISSUE - 9 | OCTOBER - 2023

# अध्यापन हे शास्त्र की कला?

**प्रा.डॉ. सुकेशिनी अंकुश जानराव**
**कॉलेज ऑफ एज्युकेशन, घारगाव, ता. श्रीगोंदा, जि. अहमदनगर**

## प्रस्तावना -



शिक्षक जन्माला यावा लागतो तो तयार करता येत नाही किंवा एखाद्या शिक्षकासंबंधी तो हाडाचा शिक्षक आहे असे आपण ज्यावेळी म्हणतो त्यावेळी अध्यापन ही एक कला आहे. ती सर्वांनाच साध्य होण्यासारखी नाही आणि जबरदस्तीने मारून मुटकून कोणाला शिक्षक करता येणार नाही असा आपल्या म्हणण्याचा अर्थ असतो. एका अथनि हे बरोबरही आहे. तथापि प्रत्येक कलेचेही एक शास्त्र असते. गायन ही कला आहे. पण त्याचेही एक शास्त्र आहे अणि गायनाचे शास्त्रशुद्ध शिक्षण घ्यावे लागते. चित्रकला हीसुद्धा कलाच आहे. पण त्याचेही पद्धतशीर शिक्षण घेतल्याशिवाय चांगला चित्रकार तयार होत नाही. तसेच शिक्षणाचेही आहे. अगदी हाडाचा शिक्षक असला तरी त्याने अध्यापनाचे शास्त्र, अध्यापनाच्या पद्धती, अध्यापनाची तत्त्वे यांचे ज्ञान मिळविले असेल आणि त्यादृष्टीने सराव केला असेल तर त्याचे अध्यापन अधिक प्रभावी झाल्याशिवाय राहणार नाही. सोने हे सोनेच असते. तथापि ते तापविले, घडवले आणि त्यावर पॉलीश केले तर त्याचे मूल्य वाढल्याशिवाय राहणार नाही, त्याचा प्रभाव वृद्धिंगतझाल्याशिवाय राहणार नाही. अध्यापन आणि चांगले, प्रभावी, दर्जेदार अध्यापन यामध्ये हाच फरक आहे. अध्यापनाचा शास्त्र म्हणून अभ्यास केला तर अध्यापन अधिक प्रभावी होईल इतकेच नव्हे तर अध्यापनाची कला अवगत नसलेल्याला देखील काही अध्यापन करता येईल. म्हणून अध्यापन हे शास्त्रच आहे. सरावाने अध्यापनात सुधारणा होते आणि ते अधिकाधिक दर्जेदार होते. यावरून अध्यापन ही एक कलाच म्हटली पाहिजे. सारांश अध्यापन हे शास्त्रही आहे व कलाही आहे. पण ते शास्त्र आहे की कला आहे यापेक्षा महत्त्वाचे म्हणजे 'ती आयुष्यभर करावयाची एक साधना आहे, तपश्चर्या आहे.'

जाणिवपूर्वक अध्यापनाचा अनुभव जसजसा वाढत जातो तसतसे अध्यापन हे अधिक यशदायी, आनंददायी होत जाते. तथापि सुरुवातीला काही अध्यापन तत्त्वांचा, सूत्रांचा मागोवा घेतच अध्यापनाला सुरुवात केली पाहिजे, त्या अध्यापन तत्त्वांची सूत्रांची आपण माहिती करून घेऊ.

**अध्यापनाची तत्त्वे -**

पूर्वनियोजित उद्दिष्टानुसार पाठ्यांशाची योजना असते. या उद्दिष्टांशी संबंधित असा वर्तनबदल विद्यार्थ्यांमध्ये अपेक्षित असतो. त्या दृष्टिकोनातून शिक्षक अध्यापन करीत असतात. हे अध्यापन करण्यासाठी काही अध्यापन तत्त्वे आहेत. त्यातील काही प्रमुख तत्त्वांचा आपण अभ्यास करू.

*** प्रेरणा -** अध्ययनासाठी प्रेरणा अत्यंत आवश्यक आहे. प्रत्येक व्यक्तीच्या वर्तनाला चालना देणारी एक आंतरिक शक्ती असते. या शक्तीला मानसशास्त्रज्ञांनी प्रेरणा असे म्हटले आहे. लिंडस्ले यांनी प्रेरणेची व्याख्या पुढीलप्रमाणे केली आहे. 'साध्य गाठण्यास प्रवृत्त करणाऱ्या, विशिष्ट दिशेने वाटचाल करायला लावणाऱ्या आणि वर्तनामागचा उत्साह टिकवून धरणाऱ्या शक्तींचे मिश्रण म्हणजे प्रेरणा.'

प्रेरणेच्या वरील व्याख्येवरून आपल्या लक्षात येते की, अध्ययन पढ़न येण्यासाठी प्रेरणा महत्त्वाचे कार्य करते. आपण जे शिकणार आहोत त्याची गरज व आवश्यकता काय हे विद्यार्थ्यांना कळले पाहिजे. पोडवाला आपण पाण्यापर्यंत नेऊ शकतो पण सक्तीने आपण त्याला पाणी पाजू शकत नाही. त्याला तहान असेल तरच तो पाणी पिणार. तसेच विद्यार्थ्याला अभ्यासाची तहान असली पाहिजे, शिक्षक जे शिकविणार ते शिकण्याची गरज जाणवली पाहिजे, एकदा गरज कळली की काय साध्य करावयाचे ते कळते आणि ती गरज भागविण्याच्या दृष्टीने प्रयत्न सुरू होतात. अशी गरज निर्माण करणे हे अध्यापनाचे महत्त्वाचे तत्त्व आहे.

आंतरिक प्रेरणा व बाह्य प्रेरणा असे प्रेरणेचे दोन प्रकार केले जातात. ज्यावेळी एखादा विषय शिकण्याची उत्स्फूर्त इच्छा विद्यार्थ्यांच्या ठिकाणी दिसते त्यावेळी आंतरिक प्रेरणा कार्यरत असते. ही उत्स्फूर्त इच्छा प्रत्येक वेळी असेलच असे नाही. ज्यावेळी मनापासून इच्छा नसते त्यावेळी ती बाह्यप्रेरकांच्या मदतीने निर्माण करावी लागते. बक्षिसे, शिक्षा, स्पर्धा अशा व इतर बाह्यप्रेरकांच्या मदतीने विद्यार्थ्यांना अध्ययन प्रवृत्तकसे करता येते याची सविस्तर माहिती आपण शैक्षणिक मानसशास्त्रात मिळविली आहे.

*** क्रियाशीलता-** कोणतीही गोष्ट शिकण्यासाठी प्रबळ इच्छाशक्ती आवश्यक आहे. तशीच क्रियाशीलताही आवश्यक आहे. एखाद्याने चांगल्या पट्टीच्या पोहणाऱ्या व्यक्तीचे पोहणे पाहिले तर त्यालाही पोहण्याची इच्छा होईल पण नुसती इच्छा निर्माण झाली किंवा त्याने निरीक्षण केले, त्या पोहणाऱ्याचे कौतुक केले तरी त्याला पोहता येणार नाही. त्यासाठी त्याला स्वतःला पाण्यात उरतले पाहिजे. बुद्धी, मन, शरीर यांचा विकास त्यांच्या उपयोगातूनच होत असतो. शरीराच्या विकासासाठी जसा व्यायाम आवश्यक आहे तसेच बुद्धिच्या विकासासाठी मनन, चिंतन आवश्यक आहे. उदा. कवितेचे रसग्रहण करण्याचा विद्यार्थ्यांनी स्वतः प्रयत्न 'केल्याशिवाय कवितेमधील सौंदर्य त्यांच्या लक्षात येणार नाही. तसेच केवळ क्रिकेटचे सामने बघून क्रिकेट खेळता येत नाही. त्याकरता स्वतः कृती केली पाहिजे. कृती ही फक्त शारीरिक असेल असे नव्हे, तर ती बौद्धिक किंवा मानसिकही असू शकते. लहान मुलांच्या बाबतीत शारीरिक क्रियाशीलता असते पुढे बौद्धिक व मानसिक क्रियाशीलता अधिक वाढते. विचारशक्ती, कल्पनाशक्ती, ज्ञानलालसा यांचाही विकास व्हावा म्हणून मनन, चिंतन, समस्या सोडविण्यासाठी बौद्धिक धडपड यांची आवश्यकता आहे. या सर्व बाबींचा क्रियाशीलतेमध्ये समावेश होतो.

मान्टेसरी पद्धत, फ्रोबेल पद्धत यामध्ये क्रियाशीलतेला अधिक महत्त्व दिले आहे. 'ऐका, लिहून घ्या अणि घोकंपट्टी करा.' या शिक्षण पद्धतीला आज स्थान राहिलेले नाही. 'स्वयंअध्ययनातून स्वयंविकास' तत्त्व आज महत्त्वाचे ठरले आहे. दैनंदिन अध्यापनात पंतोजीप्रणित पद्धतीने शिकविण्यापेक्षा विद्यार्थ्यांच्या बुद्धिला आव्हान मिळेल, विद्यार्थ्यांचा जास्तीत जास्त मानसिक व शारीरिक सहभाग होईल अशा पद्धतीने शिकविणे अधिक योग्य, प्रयोगशाळा, ग्रंथालय,

क्रीडांगण, कार्यशाळा इत्यादिचा पुरेपुर वापर करण्याची सवय विद्यार्थ्यांना लावली तर विद्यार्थी हा एक कृतीशील घटक बनण्यास मदत होईल.

*** अभिरुची -** अभिरुची असेल तर अध्ययन होईल. शिक्षक विद्यार्थ्यांच्या मनात विविध मार्गांनी अभिरुची निर्माण करू शकतील. अशी अभिरुची निर्माण झाली म्हणजे त्यातून अवधान वाढीस लागेल. अवधान आणि अभिरुची या एकमेकांना पूरक आहेत. योग्य मार्गांनी विद्यार्थ्यांचे अवधान पाठाकडे केंद्रित करावे. अवधानामुळे विद्यार्थ्यांना विषयाचे आकलन होईल व यातूनच गोडी निर्माण होईल आणि एकदा अभिरुची वाटू लागली की मग अवधानाची काळजी नसते.

कोणतीही गोष्ट शिकण्यासाठी इच्छाशक्ती असली की विद्यार्थी क्रियाशील होतात व शिकण्यात आपोआपच अभिरुची वाटू लागते. इच्छाशक्ती निर्माण करण्यासाठी प्रेरकांचा उपयोग शिक्षक करू शकतात. तसेच विद्यार्थ्यांना गोडी वाटावी म्हणून त्यांना माहित असलेल्या बाबींपासून अध्यापनाची सुरुवात करावी आणि आकर्षक नवनवीन अध्यापन साहित्याचा योग्य वेळी उपयोग करावा. वयोगटानुसार विद्यार्थ्यांच्या आवडीनिवडी बदलतात हे लक्षात घेऊन अध्यापनातील उदाहरणांची योजना केल्यास विद्यार्थ्यांमध्ये शिकण्याची आवड निर्माण होण्यास मदत होईल. अध्यापनाच्या प्रत्येक पायरीवर अशी अभिरुची निर्माण करण्यासाठी आणि टिकविण्यासाठी खरोखर फार गरज असते ती विषयासंबंधी शिक्षकांच्या अभिरुचीची. म्हणजेच शिक्षकांजवळ आपल्या विषयाबद्दल अभिरुची नसेल तर विद्यार्थ्यांमध्ये ती निर्माण होणार नाही.

*** व्यक्तिभेद -** 'व्यक्ती तितक्या प्रकृती' ही म्हण शाळेतील विद्यार्थ्यांनाही लागू पडते हे शिक्षकांनी कधीही विसरू नये. विद्यार्थ्यांमधील फरक लक्षात घेऊन अध्यापन केल्यास मुलांच्या विकासाची उद्दिष्ट्ये साध्य होण्यास मदत होईल. प्रत्येकाच्या बौद्धिक कुवतीनुसार विद्यार्थ्यांना शिकता यावे म्हणून डाल्टन पद्धती, प्रकल्प पद्धती, क्रमान्वित अध्ययन अशा विविध अध्यापन पद्धती अस्तित्वात आलेल्या आहेत. शक्य होईल तिथे शिक्षकांनी विद्यार्थ्यांकडे व्यक्तिगत लक्ष द्यावे. कुशाग्र बुद्धीच्या मुलांसाठी वेगळ्या योजना तर मंद बुद्धीच्या मुलांसाठी वेगळ्या योजना शिक्षकांकडे असाव्यात. म्हणजेच एकंदरीत शिक्षकाने सर्व विद्यार्थ्यांना एकाच साच्यात बसविण्याचा प्रयत्न करू नये कारण व्यक्तिभिन्नता ही नैसर्गिक बाब आहे. तंतोतंत साम्य असणाऱ्या दोन व्यक्ती सापडणे कठीण. शारीरिक, बौद्धिक, भावनिक व सामाजिक विकासातील वैशिष्ट्यांमुळे मुलांमध्ये विविधता असते हे लक्षात घेऊन शिक्षकांनी अध्यापनाची योजना केली पाहिजे. त्यासाठी व्यक्तिभेदाचा अभ्यास प्रत्येक शिक्षकाने केला पाहिजे.

*** उद्दिष्टानुवर्ती अध्यापन -** शिक्षणाने व्यक्तीचा विकास होतो. सर्वांगीण विकास होतो आणि हा विकास होण्याकरता त्याला विविध विषयांचे अध्ययन करावे लागते. शाळेत अनेक विषय शिकविले जातात. सर्वच अध्यापनाचे अंतिम उद्दिष्ट एकच असले तरी प्रत्येक विषयाच्या अध्यापनाची काही उद्दिष्टे असतात. कोणत्याही एखाद्या विषयाच्या अभ्यासाने मुलांचा सर्वांगीण विकास होत नाही. प्रत्येक विषयाच्या अध्ययनाने काही गुणांचा विशेष विकास होतो तर अन्य काही गुणांच्या विकासाला हातभारही लागतो. अध्यापन करतांना शिक्षकाने ही सर्व उद्दिष्टे नजरेसमोर ठेवली पाहिजेत. आपल्या अध्यापनातून व्यक्तीचा आवश्यक तो विकास घडवून आणला पाहिजे. त्यादृष्टीने त्या त्या विषयाची मांडणी केलेली असते, अभ्यासक्रम निश्चित केलेला असतो. उद्दिष्ट नजरेसमोर ठेवून अध्यापन केले म्हणजेच विद्यार्थ्यांचा खऱ्या अर्थाने विकास होईल म्हणून अध्यापनाच्या प्रमुख तत्त्वांमध्ये उद्दिष्टानुवर्ती अध्यापनाचा समावेश केला आहे.

*** जीवनाशी निगडित अध्यापन -** अध्यापनात विद्यार्थ्यांच्या अभिरुचीचा विचार करावा हे तत्त्व आपण पाहिले. ही अभिरुची निर्माण होण्यासाठी आणि निर्माण झालेली अभिरुची टिकवून ठेवण्यासाठी अध्यापन हे विद्यार्थ्यांच्या

अनुभवांशी, त्यांच्या दैनंदिन जीवनाशी निगडीत असावे असे तत्त्व प्रचलित आहे... अध्यापन करतांना शिक्षकांनी विद्यार्थ्यांच्या जीवनातील अनुभवांचा उपयोग केला पाहिजे. त्यावर आधारीत उदाहरणे दिली पाहिजेत. आवश्यक तर विद्यार्थ्यांना विविध अनुभव दिले पाहिजेत. विद्यार्थ्यांचे वय लक्षात घेऊन विद्यार्थ्यांकडे अनुभव नसतात असे वाटण्याची शक्यता आहे. परंतु विद्यार्थ्यांच्या सभोवतालच्या वातावरणानुसार, त्यांच्या निवासाच्या सभोवती असलेल्या भौगोलिक पर्यावरणानुसार, त्या प्रदेशातील हवामानानुसार, विद्यार्थ्यांच्या कौटुंबिक अनुभवांनुसार, त्यांच्या सांपत्तिक स्थितीनुसार, विद्यार्थ्यांना वेगवेगळे अनुभव येत असतात. सर्वच विद्यार्थ्यांना सर्व अनुभव असतील असे नाही. सर्वच मुलांची ग्रहणक्षमता, निरीक्षणशक्ती किंवा तर्कशक्ती सारखीच असणार नाही. त्यामुळे एकाच वर्गात विविध अनुभव असलेले विद्यार्थी शिकत असतात. म्हणून शिक्षकांनी अध्यापन करतांना या वेगवेगळ्या विद्यार्थ्यांच्या अनुभवांचा उपयोग करून त्यांच्याशी निगडीत असे शिक्षण दिले पाहिजे. काही विषयात हे अगदी सहज शक्य होते. भूगोल, आरोग्यशास्त्र, सामान्यविज्ञान, प्राथमिक गणित, भाषा इत्यादी विषयात या दृष्टीने अडचण निर्माण होत नाही. प्रत्येक गावाला, प्रदेशाला काही इतिहास असतोच. प्रत्येक ठिकाणी काही विशेष पिके असतात, सांगितलेली व्यापार असतो. या गोष्टींचा उपयोग इतिहास शिकवितांना, गणित शिकवितांना शिक्षकांनी करावयास हवा. शिक्षकांनी शिकविलेली माहिती, दिलेले ज्ञान, उदाहरणे आपल्या जीवनाशी निगडीत आहेत असे विद्यार्थ्यांच्या लक्षात आले म्हणजे त्यांचे अध्ययन आणि पर्यायाने शिक्षकांचे अध्यापन चांगले होते. आपल्या जीवनाशी ज्याचा काही संबंध नाही ती माहिती विद्यार्थी फारशी ग्रहण करीत नाही आणि जी थोडीफार ग्रहण केली असेल ती टिकून राहत नाही. म्हणून जीवनाशी निगडीत अध्यापन हे तत्त्व शिक्षकांनी नजरेसमोर ठेवले पाहिजे.

*** नियोजन -** कधी कधी शिक्षक उत्साहाच्या भरात शिकवितांना एखाद्या मुद्यावर विशेष भर देऊन, विविध उदाहरणे देऊन, शैक्षणिक साहित्य वापरून आपला मुद्दा प्रभावी व आकर्षक पद्धतीने मांडतात. त्यामुळे अध्यापन प्रभावी होते हे खरे. तथापि त्याकरीता खर्च झालेला वेळ आणि त्या मुद्द्याचे महत्त्व यांचा विचार व्हावयास हवा. साध्या, सोप्या, सहज समजणाऱ्या मुद्द्याकरिता कमी वेळ आणि अवघड मुद्द्याकरिता अधिक वेळ, अधिक उदाहरणे, विविध प्रकारचे साहित्य शिक्षकांनी वापरले पाहिजे. यासाठी अध्यापनाची सुरुवात होण्यापूर्वीच नियोजन केले पाहिजे. घराचे बांधकाम करण्यापूर्वीच जसा आराखडा तयार करतात. तसाच अध्यापनाचाही आराखडा केला पाहिजे.

वर्गातील अध्यापनातून नेमकी कोणती उदिष्टे साध्य करावयाची आहेत ? ही उद्दिष्टे साध्य करण्यासाठी कोणती अध्यापन पद्धती वापरावी लागेल ? कोणते अध्यापन साहित्य उपयुक्त ठरेल ? अध्ययन अनुभव कोणत्या प्रकारचे द्यावे लागतील ? इत्यादी प्रश्नांची उत्तरे व पाठाचे व्यवस्थित नियोजन शिक्षकांनी अध्यापनापूर्वीच केले पाहिजे. प्रत्येक पाठाचे नियोजन जसे आवश्यक असते तसेच वर्षाच्या प्रारंभी, वर्षभराच्या अभ्यासक्रमाच्या अध्यापनाचे व त्यासाठी लागणाऱ्या साहित्याचे वार्षिक नियोजनही प्रत्येक शिक्षकांनी करावयास हवे.

*** सर्जनशीलता-** शिक्षकांनी जे शिकविले केवळ तेवढेच विद्यार्थ्यांना यावे अशी आजच्या शिक्षणाची अपेक्षा नाही. तर शिक्षक जे शिकवितात त्यातून विद्यार्थी विचारप्रवृत्त व्हावेत व त्यांनी काहीतरी नवनिर्मिती करावी, नवीन कल्पना, नवीन योजना जन्माला यावी अशा पद्धतीने शिक्षकांनी शिकविले पाहिजे. म्हणजे एकंदरीत मुलांच्या मनात विचारांचे बी पेरण्याचे काम शिक्षकांचे तर ते रुजविण्याचे, फुलविण्याचे काम विद्यार्थ्यांचे असेल.

सर्जनशील म्हणजे नवनिर्माणक्षम. पूर्वापार चालत आलेल्या रुढीनुसार विचार न करता किंवा एकाच दिशेने विचार न करता विविध मार्गांनी विचार करणे हे सर्जनशीलतेत अपेक्षित आहे. मुलांमधील सर्जनशीलतेचा विकास करण्यासाठी शिक्षकांना व्यक्तिभिन्नतेचे तत्त्व माहित असावे. विद्यार्थ्यांवर असलेले अभ्यासाचे सततचे दडपण कमी

करावे. कोणत्याही विषयाशी संबंधित नसलेली अशी एखादी तासिका वेळापत्रकात असावी. मौज म्हणून एकादी समस्या सोडविण्यास द्यावी, मुलांना सतत नवनवे अनुभव द्यावेत, नवीन माहिती मिळवावी म्हणून त्यांना उत्तेजन द्यावे. मुलांच्या नवीन कल्पनांचा शिक्षकांनी आदर केला तर सर्जनशील विचारांना अधिक वाव मिळेल. मुलांना असे स्वाध्याय द्यावेत की ज्यामध्ये ते स्वतःचे विचार, कल्पना स्वत:च्या मर्जीप्रमाणे मांडू शकतील. वेगवेगळे खेळ शोधून त्यातून विद्यार्थ्यांना विचार प्रवृत्त करावे.

प्रभावी संप्रेषण हे सुद्धा अध्यापनाचे एक महत्त्वाचे तत्त्व मानले आहे. संप्रेषणाची सविस्तर माहिती आपण पुढील प्रकरणात मिळविणार आहोतच. त्याचबरोबर लोकशाही प्रधानता, निदानात्मक व उपचारात्मक अध्यापन इ. तत्त्वे सांगितली गेली आहेत. अशा या अध्यापनसिद्धान्ताचे पालन शिक्षकांनी केले तर अध्यापन प्रभावी होण्यास निश्चितच मदत होईल.